


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३०, बुधवार १८ डिसेंबर २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# दिव्यांगांचे अनुदान तीन हजार रुपये करा !

**■ आ. काशिनाथ दाते यांची विधानसभेत मागणी ■ औचित्याच्या मुद्दाद्वारे वेधले सरकारचे लक्ष ■ चार महिन्यांपासून रखडलेले अनुदान देण्याचीही मागणी**

**नागपुर : प्रतिनिधी**

**दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेमार्फत दरमहा देण्यात येणाऱ्या अनुदानात दिड हजार रूपयांची वाढ करून ते तिन हजार रूपये करण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी औचित्याच्या मुद्दाद्वारे मंगळवारी विधानसभेत केली. गेल्या चार महिन्यांपासून संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत देण्यात येणारे अनुदान रखडले असून हे अनुदानही सबंधितांच्या खात्यावर वर्ग करण्याची मागणी दाते यांनी यावेळी केली.**

सभागृहात आपली मागणी मांडताना आ. दाते म्हणाले, महाराष्ट्रामध्ये दिव्यांगांच्या मागण्यांसाठी आंदोलने सुरू आहेत. कालही नागपुरमध्ये आपल्या मागण्यांसदर्भात दिव्यांगांनी आंदोलन केले. पारनेर-नगर मतदारसंघात गेल्या चार महिन्यांपासून दिव्यांगांचे अनुदान त्यांच्या खात्यावर वर्ग झालेले नाही. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दिव्यांगांना १ हजार ५०० रूपयांचे अनुदान दिले जाते. वाढत्या महागाईचा विचार केला तर दिड हजार रूपयांमध्ये दिव्यांगांचा उदरनिर्वाह होत नाही. त्यांना इतर मजुरीची कामे करता येत नाहीत. केवळ शासनाच्या अनुदानावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो याकडे दाते यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना दिव्यांगांच्या अनुदानात वाढ व्हावी ही अनेक वर्षांपासूनची दिव्यांगांची मागणी असल्याचे सांगितले.



■ दिव्यांगांचे अनुदान दिड हजारांवरून तिन हजार करा अशी मागणी आ. काशिनाथ दाते यांनी मंगळवारी विधानसभेत औचित्याच्या मुद्यादवारे केली.

## प्रकरणे मंजुरीसाठी मार्ग काढा

सरकार बदलल्यानंतर विविध समित्याही बरखास्त झाल्या आहेत. नव्याने समित्या गठीत होईपर्यंत संजय गांधी निराधार योजनेचे जे काही प्रलंबित प्रकरणे मंजुर करण्यासाठी काहीतरी मार्ग काढला पाहिजे अशी मागणी दाते यांनी सभागृहात केली.

## रखडलेले अनुदान वर्ग करा

दिव्यांगांच्या अनुदानाबरोबरच संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत श्रावण बाळ, विधवा परित्यक्त्या, आदी योजनांचे अनुदान गेल्या चार महिन्यांपासून रखडलेले आहे. कोणत्याही लाभार्थ्याला या अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. हे लाभार्थी सातत्याने आमच्याकडे चकरा मारून हे अनुदान मिळाले नसून ते मिळाले पाहिजे अशी मागणी करत असल्याचे दाते यांनी सांगितले.

## आंध्रप्रदेशात तिन हजारांचे सहा हजार होणार!

शेजारच्या आंध्र प्रदेश राज्यात दिव्यांगांना तिन हजार रूपये अनुदान दिले जाते. त्यात नव्याने तिन हजार रूपयांची भर टाकून सहा हजार रूपये अनुदान आंध्र प्रदेशात दिले जाणार असल्याची माझी माहीती आहे. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की दिव्यांगांच्या सध्याच्या दिड हजार रूपये अनुदानामध्ये आणखी दिड हजार रूपयांची वाढ करून तिन हजार रूपये अनुदान करणे गरजेचे आहे. दिव्यांगांचीही तशी मागणी असून त्याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करतो.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

# अवैध वाळू वाहतूक करणारे दोन डंपर जप्त

**स्थानिक गुन्हे शाखेची नागापुरवाडीत कारवाई**
**दोन आरोपींकडून ४० लाख ८० हजारांचा मुद्देमाल हस्तगत**

**पारनेर : प्रतिनिधी**

**अवैध वाळू वाहतूक करणारे दोन डंपर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नागापूरवाडीत जप्त केले. दोन आरोपींकडून दोन डंपरसह ४० लाख ८० हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.**

अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना कारवाईसंदर्भात आदेश दिले होते. त्यानंतर निरीक्षक आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार संदीप दरंदले, सोमनाथ झांबरे, रणजीत जाधव व बाळासाहेब गुंजाळ यांना अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीचा शोध घेऊन कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

पारनेर तालुक्याच्या हद्दीतील अवैध वाळू उपशासंदर्भात पथकाकडून माहीती घेतली जात असताना गुप्त बातमीदाराकडून नागापुरवाडी ते पळशी या मार्गावर दोन टाटा कंपनीचे १६१८ या मॉडेलचे डंपर अवैध वाळूची वाहतूक करणार असल्याची माहिती समजली. पथकातील कर्मचाऱ्यांनी तात्काळ नागापुरवाडीकडे धाव घेत सपळा रचला असता मिळालेल्या माहितीनुसार पांढऱ्या रंगाचे दोन ढंपर वाळूची अवैध वाहतूक करताना पथकाला आढळून आले.

पथकाने दोन्ही डंपर थांबवून चौकशी केली असता दोन्ही डंपरमधून वाळूची वाहतूक करण्यात येत होती. ज्ञानदेव भिमाजी रक्टे वय ३१ रा. कासारे, ता. पारनेर व अंकुश पोपट केदार वय ३२ रा. पळशी हे दोघे ही दोन डंपरमधून अवैध वाळूची वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले.



■ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध वाळू वाहतूक करणारे दोन डंपर जप्त करून दोघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ४० लाख ८० हजारांचा मुद्देमाल

दोन्ही डंपर चालकांकडे वाळू वाहतूकीचा कोणताही शासकीय परवाना नसल्याने पंचांसमक्ष एमएच २२ एएन ७१७१ व एमएच ११ एएल ६२८० हे ४० लाख रूपयांचे दोन डंपर तसेच प्रत्येकी ४० हजार रूपयांची चार ब्रास वाळू असा ४० लाख ८० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येऊन दोन्ही आरोपींविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचा पुढील तपास पारनेर पोलीस करत आहेत. पोलीस अधिक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून ही कारवाई करण्यात आली.

# मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा हत्यार उगारले

**२५ जानेवारी पासून उपोषणाला बसणार | सात ते आठ मागण्या मान्य करण्याची मागणी**

**जालना : प्रतिनिधी**

**निवडणुकीच्यापूर्वीपासून मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे आरक्षणासाठी उपोषण व आंदोलन करत आहेत. त्यांना ओबीसी अंतर्गत मराठा आरक्षण हवे असल्याची मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आता पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील हे अ‍ॅक्शनमोडमध्ये आले आहेत. जालनामध्ये माध्यमांशी संवाद साधून जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी ही उपोषणाची नवीन तारीख जाहीर केली आहे.**



यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी सुरुवातीला मैदानामध्ये उतरण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ऐनवेळी त्यांनी माघार घेत कोणतीही निर्णायक घोषणा केली नव्हती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला न भूतो न भविष्यती असे एकतर्फी यश मिळाले. मनोज जरांगे पाटील यांनी पूर्णपणे रोष व्यक्त केल्यानंतर देखील देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आहेत. यामुळे आता राजकीय वर्तुळामध्ये जरांगे पाटील यांच्या भूमिकेची चर्चा सुरु होती. आता मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचे हत्यार उगारले आहे. तसेच याची तारीख जाहीर केली आहे.

जालनामध्ये माध्यमांशी संवाद साधताना मराठा नेते मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ''आता नागपूरमध्ये सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये तरी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावतील अशी अपेक्षा आहे. सरसकट मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सरकारने सुरु ठेवावे. आम्ही ओबीसीमध्ये पूर्वीपासून आहोत.

आम्ही कोणाचं मागत नाहीये. मराठा तरुणांवरील सर्व केसेसे सरकारने मागे घ्याव्यात. जस्टीस शिंदे समिती यांचे काम पूर्वीप्रमाणे सुरु करण्यात यावे. पूर्वीचे कक्ष सुरु करावेत. या आमच्या सात ते आठ सर्व मागण्या पूर्ण कराव्यात. याचे आदेश हिवाळी अधिवेशनामध्ये काढावेत,'' अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

त्याचबरोबर पूर्ण मराठा समजाला सरसकट ओबीसी अंतर्गत देण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले की, ''एकाही उर्वरीत पान ३ वर

# उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

**विधीमंडळात १० ते १५ मिनिटांची चर्चा**

**नागपूर : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीला मोठा विजय मिळाला. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी मुंबई येथे पार पडला. या शपथविधीसाठी माजी मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंनाही निमंत्रण देण्यात आले होते. मात्र उद्धव ठाकरेंसह विरोधी पक्षातील अनेक नेते शपथविधीला हजर राहिले नाहीत. मात्र आता उद्धव ठाकरे यांनी नागपूरच्या विधीमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. या भेटीवरून आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. मात्र ही सदिच्छा भेट असल्याचे बोलले जात आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुखउद्धव ठाकरे,माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना फोन करून निमंत्रण दिले होते. मात्र विरोधकांमधून कुणीही यावेळी उपस्थित राहिले नाही. याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीनंतरच्या पत्रकार परिषदेत भाष्य केले होते. यानंतर आज हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे यांनीअनिल परब,आदित्य ठाकरे, वरूण सरदेसाई आणि सचिन अहिर यांच्यासह मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.

**१० ते १५ मिनिटे चर्चा**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला केवळ ४९ जागा मिळाल्या आहेत. यात शिवसेनेला सर्वाधिक २० जागा जिंकता आल्या आहेत. विरोधी



पक्षनेतेपदासाठी विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १० टक्के जागा जिंकणे गरजेचे आहे, असा पायंडा आहे. मात्र एकाही पक्षाला २९ जागा जिंकता आलेल्या नाहीत. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय विधानसभा अध्यक्ष घेतील. या पार्श्वभूमीवर आज उद्धव ठाकरेंनी उर्वरीत पान ३ वर

# येरवडा कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी

**एक जण जखमी, दोन जणांवर गुन्हा दाखल**

**पुणे : प्रतिनिधी**

**येरवडा मध्यवर्ती कारागृहात किरकोळ वादातून कारागृहातील कैद्याला दोन जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दोन आरोपी विरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

याप्रकरणात सुधीर गौतम थोरात असे जखमी झालेल्या कैद्याचे नाव आहे. याप्रकरणी कारागृहातील बंदी विकी उर्फ विवेक राजेश खराडे, अली अदम शेख या आरोपींच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी कारागृहातील रक्षक विश्वास वाकडे (वय ४३) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा कारागृहामध्ये एका बराकीत १४ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास कैदी सुधीर थोरात याला विकी खराडे, अली शेख यांना जबरदस्तीने अडवले. 'कारागृहातून कधी सुटणार?', अशी विचारणा केली. या कारणावरुन त्यांच्यात




किरकोळ वाद झाला.

या वादातून खराडे आणि शेख यांनी थोरात याला लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीत थोरात याची बरगडी, तसेच नाकाला दुखापत झाली. कारागृहात मारहाण झाल्याची माहिती मिळताच कारागृह रक्षकांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेतली. थोरातला रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर प्रथमोपाचार करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच, येरवडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके, गुन्हे शाखेच्या निरीक्षक पल्लवी मेहेर, स्वाती खेडकर यांनी कारागृहास भेट दिली. सहायक पोलिस निरीक्षक विशाल टकले पुढील तपास करत आहेत.

# इंडिया आघाडीच्या आंदोलनात खा. लंके यांचा सहभाग

**संतोष देशमुख हत्या, बांगलादेशातील अत्याचाराविरोधात आंदोलन**

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**बीड जिल्हयातील मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची अमानुष हत्या तसेच बांगलादेशातील हिंदू व ख्रिश्चन बांधवांवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या कामकाजास सुरूवात होण्यापूव संसदेसमोर आंदोलन केले. नगरचे खासदार नीलेश लंके हे या आंदोलनात सहभागी झाले होते.**

हत्येचा आरोप असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करा, खुनाचे कारण असलेल्या खंडणी प्रकरणातील आरोपींना हत्येच्या गुन्हयात आरोपी करा, आरोपींना अटक करून खटला अंडर ट्रायल चालवा, अशा प्रकारच्या खंडणी, अपहरण, छळ, खुनाच्या सर्व गुन्हयांचा तपास केंद्रीय गुप्तचर विभागाकडून करण्यात यावा, बीड जिल्हयामध्ये कायद्याचे राज्य स्थापन करा अशा मागण्या यावेळी इंडिया आघाडीच्या खासदारांकडून करण्यात आल्या.




■ संतोष देशमुख हत्या तसेच बांगलादेशातील अत्याचाराविरोधात इंडिया आघाडीच्या वतीने संसदेबाहेर करण्यात आलेल्या आंदोलनात खा. नीलेश लंके यांनी सहभाग नोंदविला.

बांगलादेशात हिंदू आणि ख्रिश्चनांवर होणाऱ्या अत्याचारावर केंद्र सरकार बोलत नाही म्हणून खासदारांनी हातात बांगलादेशातील हिंदू आणि ख्रिश्चनांच्या पाठीशी उभे रहा असे लिहिलेल्या बॅग हाती घेत आंदोलन केले. काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधीही या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.



# तंत्रमंत्र


विज्ञानयुगातील बितंबातम्या

**आजच्या काळात मुले स्मार्टफोनशिवाय राहू शकत नाहीत. कारण यूट्यूबवर बहुतेक मुलं कार्टून किंवा रील्स पाहतात, पण तुम्हाला माहीत आहे का, की गुगल आणि यूट्यूबने यूट्यूब आणि गुगल अकाउंट कोणी बनवायचे याचे नियम ठरवून दिले आहेत**

## Google अन् YouTube वापरण्यास वयोमर्यादा, पण किती ?



Google खाते तयार करण्यासाठी वयोमर्यादा १३ वर्षे आहे. YouTube व्हिडिओ अपलोड करण्यासाठी किमान वयोमर्यादा १३ वर्षे आहे. वेगवेगळ्या देशांसाठी वेगवेगळी वयोमर्यादा आहे. आजकाल लहान मुलं गुगल आणि यूट्यूबवर व्हिडीओ पाहिल्यावरच जेवतात. बोलण्यासोबतच मुलांचे यूट्यूब चॅनल तयार केले जाते. पण YouTube आणि Google च्या मते, अल्पवयीन मुले स्वतःचे Google खाते तयार करू शकत नाहीत. YouTube खाते तयार करणे आणि व्हिडिओ पाहणे यावर लहान मुलांसाठी निर्बंध आहेत. Google च्या धोरणानुसार, १३ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले स्वतःचे Google खाते तयार करू शकत नाहीत. ही वयोमर्यादा दक्षिण कोरियामध्ये १४ वर्षांपर्यंत आहे तर व्हिएतनाममध्ये Google खाते तयार करण्यासाठी किमान वयोमर्यादा १५ वर्षे आहे. त्याचप्रमाणे, युरोपियन देशांमध्ये नेदरलँड आणि हंगेरीमध्ये वयोमर्यादा १६ वर्षे आहे. YouTube च्या नियमांनुसार, जर तुम्ही तुमचे YouTube खाते वयाच्या १३ वर्षांपूर्वी तयार केले असेल, तर Google प्रमाणेच तुमचे खाते १४ दिवसांनी बंद होते. काही देशांमध्ये, १३ वर्षांनंतरही, पालकांच्या परवानगीशिवाय YouTube चॅनेल तयार करता येत नाही. याशिवाय YouTube वर मुलांसाठी १८+ कंटेंटवर बंदी घालण्यात आली आहे. YouTube वर १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना १८+ सामग्री दाखवली जात नाही.




### मुलांसाठी YouTube चॅनेल कसे तयार करावे ?

एखादे मूल १३ वर्षांपेक्षा कमी वयाचे असल्यास, त्याला किंवा तिला पालकांच्या देखरेखीखाली YouTube खाते तयार करण्याची आणि ऑपरेट करण्याची परवानगी आहे. यामध्ये पालकांना फॅमिली लिंकवर जाऊन कंट्रोल्स सेट अप करावे लागतील. हे एक प्रकारचे पालक नियंत्रण असेल. १८ वर्षांखालील मुलांनी त्यांच्या व्हिडिओंची कमाई करण्यासाठी त्यांच्या YouTube चॅनेलला मान्यताप्राप्त AdSense खात्याशी लिंक करणे आवश्यक आहे. जर तुमच्या व्हिडिओमध्ये अतिप्रसंग, अल्कोहोल, धूम्रपान, अश्लीलता आणि असभ्यता यासारख्या धोकादायक क्रिया असतील तर ते १८ प्लस मानले जाईल. तसेच, असे व्हिडिओ अपलोड करण्यासोबतच डिस्प्लेवर इशाराही द्यावा लागणार आहे.

# २०२४ मध्ये युट्यूबवर सर्वाधिक काय पाहिले गेले?

**दरवर्षी टॉप ट्रेंडिंग लोकांची यादी, गाणी आणि संगीत युट्यूबद्वारे जाहीर केले जाते. या वर्षी देखील एक यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्यात रतन टाटा यांचे व्हिडिओ खूप पाहिले गेले आहेत. तसेच अरिजित सिंग, खेसारी लाल यादव यांसारख्या गायकांची संगीतात धूम राहिली...**

२०२४ हे वर्ष अंतिम टप्प्यात आहे. अशा स्थितीत, युट्यूबने वर्षभराचा लेखाजोखा समोर आणला आहे. यात देशातील व्हिडिओ पाहण्याच्या बाबतीत काय पसंत केले जात आहे याची झलक दिसून आली. ट्रेंडिंग विषयांमध्ये ICC मेन्स T20 विश्वचषक, २०२४ इंडियन प्रीमियर लीग, मोय मोय, लोकसभा निवडणूक आणि अज्जू भाई यांचा समावेश आहे.

## वर्ष २०२४ चे टॉप ट्रेडिंग विषय

या वर्षातील टॉप ट्रेडिंग विषयांबद्दल बोलायला गेले तर, रतन टाटा हे यूट्यूबच्या टॉप ट्रेंडिंग लिस्टमध्ये होते, ज्यांचे २०२४ मध्ये निधन झाले, ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते. तसेच मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानी याच्या लग्नाचा उत्साह वर्षभर यूट्यूबवर पाहायला मिळत आहे. तोच दिलजीत जोसांझ त्याचे संगीत दौरे आणि कार्यक्रम देशभर करत आहे, ज्यासाठी तो यूट्यूबवर खूप लोकप्रिय आहे.

- रतन नवल टाटा
- अनंत अंबानी ( विवाह )
- कल्की २८९८ एडी
- दिलजीत दोसांझ
- ऑलिम्पिक गेम्स पॅरिस २०२४


## वर्ष २०२४ चे टॉप क्रिएटर्स

- Mr. Beast
- फिल्मी सूरज ॲक्टर
- सुजल ठक्कर
- केएल ब्रो बीजू रित्विक
- UR-क्रिस्टिआनो
- Box of Vengeance
- Stokes Twins
- प्रियाल कुखरेजा
- एलबम क्रिएशन्स
- अननोन ब्वाय वरुण

## २०२४ मधील टॉप गाणी

जर आपण या वर्षातील टॉप यूट्यूब गाण्यांबद्दल बोललो तर महेश बाबू स्टारर तेलुगू गाणे कुर्ची मदथापेट्टी हे टॉप लिस्टमध्ये आहे. तसेच आज की रात आणि मटक के चलूंगी ही गाणी खूप आवडली गेली आहेत. या यादीत खेसारी लाल यादव यांचे गाणेही टॉप ट्रेंडिंग ठरले आहे.

- Kurchi Madathapetti
- JALE 2
- आज की रात
- मटक चलूंगी
- निम्बू खरबूजा भईल 2
- तेरी बातों में ऐसा उलझा जिया
- ओ माही -अरिजीत सिंह
- गुलाबी साड़ी
- अपने लबर को धोखा दो
- आई नाई



# रोबो @ २०२४!

**दक्षिण कोरियात सायबोर्ग नावाच्या रोबोने नऊ तास ड्युटीला त्रासून 'आत्महत्या' केल्याच्या बातम्या काही महिन्यांपूर्वी झळकल्या... २६ जून रोजी या रोबोचा 'मृत्यू' झाला. त्याने पायऱ्यांवरून साडेसहा फूट खाली उडी मारून आत्महत्या (!) केल्याचे सांगितले जात आहे. मृत रोबोला ऑगस्ट २०२३ मध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमले होते. सकाळी ९ ते संध्याकाळी ६ अशी त्याची ड्युटी होती. नागरिकांना आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे त्याचे काम होते. असे काम करणारा हा पहिला रोबो. त्याच्याकडे प्रशासकीय अधिकाऱ्याचे अधिकृत कार्ड होते. लिफ्टचा वापर करून हव्या त्या मजल्यावर तो जाई. कॅलिफोर्नियाच्या बीअर रोबोटिक्स या कंपनीने हा रोबो विकसित केला होता.**

दक्षिण कोरियात रोबोंचा प्रभावी वापर होतो आणि जगातील सर्वाधिक कार्यरत रोबो तेथेच आहेत. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सनुसार तेथे दर १० कर्मचाऱ्यांमागे एक रोबो आहे. आत्महत्येच्या ( ? ) वेळी काही साक्षीदारांच्या मते त्यांनी सायबोर्गला जागीच गरगरताना आणि मग स्वतःला झोकून देताना पाहिले. खाली कोसळताना त्याचे तुकडे झाले. त्या तुकड्यांचे विश्लेषण सध्या चालू आहे. एखादे यंत्र काम करेनासे होते, नादुरूस्त होते




किंवा बंद पडते तेव्हा ते 'कामातून गेले' असे आपण म्हणतो. इंग्रजीत 'डेड झाले' म्हणत असल्याने व हा रोबो अधिकाऱ्याच्या जागी काम करत असल्याने 'मृत' शब्द वापरला गेला हे ठीक आहे; पण रोबो 'आत्महत्या' करू शकेल का?

'तेरी बातोंने ऐसा उलझा दिया' या चित्रपटातली नायिका सिफ्रा ( क्रिती सनॉन ) एक आधुनिक गृहकृत्यदक्ष युवती रोबो असते. तिला पहिल्यांदा साडी नेसलेली पाहून तिच्या सौंदर्याची स्तुती करताना नायकाची आत्या म्हणते, 'आज तो तुम पुरे शहर में आग लगा दोगी.' सिफ्रा विचारते, 'क्या आप चाहती है मै पूरे शहर में आग लगा दूँ?' नायक घाईघाईने तिला सांगतो, 'अरे, ये मजाक कर रही है!' यावर 'ओह! जोक!' असे म्हणत सिफ्रा यांत्रिक ( अमानवी ) पद्धतीने 'ही... ही... ही...' करते. सिनेमात कथा फुलविण्यासाठी थोडे स्वातंत्र्य घेतले गेले असले तरी असे रोबो केवळ 'प्रतिसाद' देऊ शकतात व तेही त्यांना जसे 'प्रोग्राम' किंवा डिझाइन केले आहे त्यानुसार. मदतनीस किंवा सेवा देणारे रोबो माणसासारखा संवाद कसा साधतात, याचे उत्तर त्यांच्या ए-आय संरचनेमध्ये आहे. यासाठी नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग ( एनएलपी ) या ए-आयच्या शाखेचा उपयोग होतो. मानवी भाषा समजून घेणे आणि त्याचा अर्थ लावणे हे तिचे कार्य आहे. हे प्रोग्राम डीप लर्निंगच्या साहाय्याने शक्य तितके फाइन-ट्यूनिंग करत भाषा निर्मिती क्षमता सुधारण्याचा व संभाषण सुसंगत राखण्याचा प्रयत्न करतात. हाडामासाच्या माणसाने गप्पा मारल्याचा भास व्हावा इतक्या सहजभावापर्यंत पोहोचणे, हे या प्रोग्रामचे अंतिम लक्ष्य असते. पण माणूस आपल्या दहा टक्के भावना शब्दातून व्यक्त करतो आणि बाकी त्याच्या हावभाव आणि शरीरभाषेतून. म्हणजे मानवी भाषाच नव्हे तर मानवी चर्येवरचे भाव आणि देहबोली सुद्धा या मदतनीस रोबोंना समजायला हवी. तरच ते अचूक संवाद साधू शकतील. यावरही मार्ग निघाला आहे.

## सीमारेषा आखलीच पाहिजेत...

कार्यक्षमता व उत्पादकता वाढावी या हेतूने माणसाऐवजी रोबो अधिकाऱ्यांवर काम सोपवल्याने होणाऱ्या परिणामांचा विचार करण्याची आणि आत्मपरीक्षणाची वेळ द. कोरियावरच नव्हे तर जगावर आली आहे. रोबोने माणसाचे काम हलके करणे अपेक्षित आहे की माणसाऐवजी काम करणे अपेक्षित आहे! लक्षावधी वाहनचालकांना बेरोजगार करणाऱ्या स्वयंचलित गाड्यांना मी भारतात प्रवेश करू देण्याच्या विरोधात आहे, अशी भूमिका केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घेतली होती. त्या त्या देशातील नेत्यांनी नव्या तंत्रज्ञानाच्या अतिवापराचा व त्याच्या संभाव्य परिणामांचा विचार करून ठाम भूमिका घेणे आता आवश्यक आहे. माणूस दिवसेंदिवस यांत्रिक आणि रोबो ह्युमनॉईड होत चाललेला असताना या दोघांमधली पुसट होणारी सीमारेषा वेळीच ठळक करायला हवी.




## भावनाशील ह्युमनॉईड

चीनमधील शांघाय येथे नुकत्याच पार पडलेल्या जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद २०२४ मध्ये फुदन विद्यापीठाने 'ग्युआनघुआ क्र. १' हा भावनाशील ह्युमनॉईड सादर केला. याला राग, खिन्नता, दुःख, आनंद व उल्हास यासारखे भाव दाखवता येतात. १६५ सेंमी उंची व ६२ किलोग्रॅम वजन असलेल्या या ह्युमनॉईडमध्ये ४५ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सांधे आहेत. यामुळे तो 'कठपुतळी'सारख्या कडक हालचाली न करता मानवी हालचाली करून नैसर्गिक पद्धतीने उठ-बस करतो. वृद्धांना मदत व्हावी या हेतूने हे ह्युमनॉईड बनले आहेत. दुसरीकडे जपानमध्ये मानवी त्वचेसारख्या प्रतीचे रासायनिक आवरणाचे रोपण रोबोवर होत आहे. हसताना जबड्याची त्वचा ताणली जाते, वैतागल्यावर कपाळावर आठ्या पडतात, तसे या रोबोच्या चेहऱ्यावर उमटले तर त्याच्या आणि माणसाच्या दिसण्यातले आणि वागण्यातले अंतर हळूहळू संपत जाईल. आता त्याच्यात आणि माणसात फरक राहिला तो समानुभूतीचा आणि भावनानिर्मितीचा.

## तर जगणे अवघड होईल!

तंत्रहृदयी ए-आय किंवा कृत्रिम बुद्धीला कधीही सहानुभूती कळत नाही आणि समानुभूती घेता येत नाही. कसलाही 'अनुभव' घेता येत नाही. मुळात आत्महत्येआधी मानवी मनात जी प्रचंड उलथापालथ व मेंदूत ज्या घडामोडी होत असतील त्या रोबोमध्ये होणे शक्य नाही. कारण त्याला 'मन' नाही. म्हणजेच हा रोबो एक यंत्र म्हणून 'मृत' झाला. तंत्रज्ञ आणि आर्टिस्ट सॅन मार्कोस ( कॅलिफोर्निया ) हे रिअल बॉटिक्स कंपनी चालवतात. त्याद्वारे डिजिटल बाहुल्यांची ( रोबो ) निर्मिती करताना २०१७ मध्ये त्यांनी एक प्रयोग केला. रोबो मदतनीसांबाबत माणसांच्या प्रतिक्रिया त्यांना अजमावून पाहायच्या होत्या. त्यांनी काही रुग्णांना प्रत्यक्ष डॉक्टरांशी बोलायला सांगितले आणि काही रुग्णांना डॉक्टरांच्या डिजिटल 'अवतारा'शी. पेशंट डिजिटल अवतारांशी जास्त सहज बोलू शकले. कारण तो आपल्याला 'जज' करत नाही, असे पेशंटचे मत पडले. सॅन यांच्या मते यातून अशीही शक्यता आहे की भावनाप्रधान माणसे या निरपेक्षपणातून निर्विकार म्हणजेच यंत्रहृदयी बाहुल्यांच्या ( रोबोंच्या ) प्रेमातही पडतील. काही त्यांच्या इतके आहारी जातील की त्यांच्यावाचून माणसाचे जगणे अवघड होईल. यातून नवे मानसिक आरोग्याचे प्रश्न उपस्थित होतील.



# रिफर्बिश्ड लॅपटॉप खरेदी करताना...

**जर तुम्ही रिफर्बिश्ड लॅपटॉप घेण्याचा विचार करत असाल तर तुम्ही काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. तुम्ही चुकीच्या वेबसाइटवरून खरेदी केल्यास, तुमचे नुकसान होऊ शकते. खरेदी करण्यापूर्वी, त्याची कंडीशन आणि क्वालिटी चेक केली पाहिजे. ऑपरेटिंग सिस्टम आणि सॉफ्टवेअर योग्यरित्या ओळखणे देखील यावेळी महत्वाचे आहे. याशिवाय आणखी काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात**

लॅपटॉप घेताना ज्यांचे बजेट आहे तेच नवीन लॅपटॉप खरेदी करतात. पण ज्यांच्याकडे पैसे कमी आहेत त्यांच्याकडे रिफर्बिश्ड लॅपटॉप विकत घेतात. अशा परिस्थितीत, जर तुम्ही जुना रिफर्बिश्ड लॅपटॉप घेण्याचा विचार करत असाल आणि कमी किमतीत चांगला लॅपटॉप घ्यायचा असेल, तर यावेळी तुम्हाला काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घ्यावी लागेल.

- कंडीशन आणि क्वालिटी : लॅपटॉपची कंडीशन आणि क्वालिटी कोणत्याही यूजरसाठी खूप महत्त्वाची असते. अशा परिस्थितीत, कोणत्याही वेबसाइट किंवा इतर प्लॅटफॉर्मवरून जुना लॅपटॉप खरेदी करताना, त्याची क्वालिटी काळजीपूर्वक चेक करा. कारण यावेळी लहानशी निष्काळजीपणाही तुमचे नुकसान करू शकते. लॅपटॉप दिसायला चांगला असला तरी त्यात आवश्यक गोष्टी नसतील तर तो विकत घेणे चांगले नाही. त्यामुळे ऑपरेटिंग सिस्टीम आणि सॉफ्टवेअर योग्यरित्या ओळखले पाहिजे. त्यात कोणती ऑपरेटिंग सिस्टम दिली आहे. याशिवाय ते कोणत्या सॉफ्टवेअरला सपोर्ट करू शकते? हे चेक करणे खूप गरजेचे आहे.



- वॉरंटी आणि रिटर्न चेक करा : अशा अनेक वेबसाइट आणि प्लॅटफॉर्म आहेत जे रिफर्बिश्ड वस्तूंची बिनधास्तपणे विक्री करत आहेत. परंतु त्यापैकी फारच कमी प्लॅटफॉर्म्स विश्वास ठेवण्यासारखे आहेत. म्हणून, जेव्हाही तुम्ही रिफर्बिश्ड लॅपटॉप खरेदी कराल तेव्हा त्यावरील रिटर्न पॉलिसी आणि वॉरंटी तपासा.
- गॅरंटी असलेल्या वेबसाइटवरून खरेदी करा : जुना लॅपटॉप किंवा स्मार्टफोन खरेदी करताना केवळ विश्वसनीय वेबसाइट निवडा. अनेकवेळा असे घडते की काही लोक सोशल मीडियावरील जाहिरातींवर विश्वास ठेवून येथून वस्तू खरेदी करतात. मात्र नंतर त्यांची फसवणूक झाल्याचे उघड झाले. म्हणूनच, खरेदीसाठी, नेहमी विश्वासार्ह वेबसाइटची निवड करा.
- रिफर्बिश्डचा अर्थ जुने नाही : रिफर्बिश्ड लॅपटॉप म्हणजे जुने नाही. याचा अर्थ कोणताही लॅपटॉप तुमच्या वापरानुसार ॲडजस्ट किंवा मॉडीफाय करणे असा आहे. या लॅपटॉपमध्ये प्रोसेसरशिवाय इतर अनेक हार्डवेअर बदलले जातात. या हार्डवेअरमध्ये स्क्रीन, स्पीकर, वेबकॅम, मायक्रोफोन, कीबोर्ड आणि कनेक्टर आदी गोष्टी चेंज करण्यात येतात.

# ऑर्डर रद्द केल्यानंतरही तुम्हाला भरावे लागू शकते शुल्क!

**सध्या ऑनलाइन शॉपिंगचा ट्रेंड चांगलाच आहे. त्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आपल्याला काहीही खरेदी करण्यासाठी बाहेर जाण्याची गरज नाही. आपण फोन वापरून ऑर्डर करू शकतो. जर आपल्याला ऑर्डर आवडत नसेल, तर आपण सहसा कोणत्याही त्रासाशिवाय ती रद्द करू शकतो. पण फ्लिपकार्टवर खरेदी करणाऱ्यांसाठी हे लवकरच बदलू शकतात.**




Flipkart, भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन शॉपिंग साइट्सपैकी एक आहे. ते आता काही ऑर्डर रद्द करण्यासाठी ग्राहकांकडून शुल्क आकारण्याची योजना आखत आहे. भविष्यात, तुम्ही तुमची ऑर्डर रद्द करू इच्छित असल्यास, तुमच्याकडून शुल्क आकारले जाऊ शकते, जे तुमच्या ऑर्डरच्या मूल्यावर अवलंबून असेल.

विक्रेते आणि वितरण भागीदारांना ऑर्डर रद्द केल्यावर वाया जाणारा वेळ आणि खर्च पुनर्प्राप्त करण्यात मदत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ठराविक कालमर्यादेनंतर रद्दीकरण शुल्क लागू होईल. ज्यामध्ये तुम्ही शुल्क न आकारता ऑर्डर रद्द करू शकता.

फ्लिपकार्टने या धोरणाची अधिकृत घोषणा केली नसली तरी, सूत्रांचे म्हणणे आहे की फसवणूक टाळण्यासाठी आणि विक्रेत्यांचे प्लॅटफॉर्मवरील नुकसान कमी करण्यासाठी हा बदल करण्यात येत आहे. हा बदल Flipkart च्या मूळ कंपनी अंतर्गत येणाऱ्या Myntra ला देखील लागू होऊ शकतो. थोडक्यात, तुम्ही ऑनलाइन खरेदीदार असल्यास, या नवीन नियमांची माहिती असणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे तुम्ही भविष्यात ऑर्डर रद्द करण्याच्या पद्धतीवर निर्णय घेऊ शकतात.

## शॉर्ट न्यूज

### गुलाबी थंडीत धावले २५० स्पर्धक

■ **नगर :** जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेत २५० खेळाडूंनी सहभाग नोंदवत गुलाबी थंडीत धावले आणि दमदार कामगिरी करत प्रावीण्य मिळवून सदर स्पर्धा गाजवली. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व अहमदनगर जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाडीया पार्क जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा सप्ताहानिमित्त रविवारी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

### लोकन्यायालयात ६ कोटी ८० लाखाची वसुली

■ **श्रीगोंदा :** १४ डिसेंबर रोजी जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा येथे राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या राष्ट्रीय लोक अदालतीची सुरुवात मोटार अपघात प्रकरणातील एका प्रकरणात मृताच्या वारसास ९५ लाख रुपयांचा धनादेश व दुस-या प्रकरणात मृताच्या वारसांना ३४ लाखांचा धनादेश देऊन सुरुवात करण्यात आली. यासह इतर प्रकरणांसह एकूण ६ कोटी ८० लाखांची वसुली करून नातेवाईकांना सुपूर्द करण्यात आली.

### रब्बीसाठी सात नंबर फॉर्म भरा

■ **श्रीरामपूर :** लाभ क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांनी हक्काच्या पाण्यासाठी जास्तीत जास्त सात नंबर फॉर्म भरून आपल्या पाण्याचा हक्क अबाधित ठेवावा, असे आवाहन आमदार हेमंत ओगले यांनी केले आहे. अहिल्यानगर जलसंपदा विभागाने ३१ डिसेंबरअखेर रब्बी आवर्तनाचे पाणी मागणी अर्ज शाखेच्या ठिकाणी उपलब्ध असल्याचे कळविले आहे. भंडारदरा व निळवंडे धरण पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. या धरणांच्या लाभ क्षेत्रातील शेतीसाठी रब्बी हंगामाची तयारी जलसंपदा विभागाकडून चालू असून, जलसंपदा विभागाने पाणी मागणी अर्ज भरून देण्यासाठी कळविले आहे.

### महिलांमध्ये मारहाण, गुन्हा दाखल

■ **नेवासा :** तालुक्यातील सोनई येथे बचतगटाचे पैसे भरण्याच्या कारणावरून दोन महिलांमध्ये वाद झाल्याची घटना घडली. याप्रकरणी सोनई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी महिलेने बचतगटाचे पैसे भरून, मला निल दाखला द्या. अशी दोघींची चर्चा सुरू होती. त्याचवेळी संगीता ही त्याठिकाणी आली व फिर्यादी महिलेस म्हणाली बचतगटाचे पैसे भरायचे नाहीत, तिला कुठलाही निलदाखला द्यायचा नाही. आमच्या दोघींचा व्यवहार चालू आहे, तू मध्ये बोलण्याचे कारण नाही, असे बोलण्याच्या रागाने संगीता हिने फिर्यादी महिलेस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

### जामखेडमध्ये बिबट्याची दहशत वाढली

■ **जामखेड :** तालुक्यात बिबट्यांचा मुक्त संचार होऊ लागला असून, शुक्रवारी (दि. १३) पहाटे ५ वाजता घोडेगाव येथील गायीचा फडशा पाडल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. सोनगाव परिसरातही बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थ दहशतीखाली आहेत. शुक्रवारी (दि. १३) पहाटे पाच वाजता घोडेगाव येथील शेतकरी सतीश बापू भोंडवे यांच्या गोठ्यातील गायीवर बिबट्याने हल्ला चढविला. त्यात ती गाय मृत्यूमुखी पडल्याचे आढळून आले आहे. या घटनेची माहिती तत्काळ वनपरिक्षेत्र अधिकारी शेळके यांना कळताच त्यांनी वन कर्मचाऱ्याला घटनास्थळी पाठविले

# माळीवाडा बसस्थानक कात टाकणार

## १६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध



**नगर : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर शहरातील मध्यवर्ती असलेले माळीवाडा बसस्थानकासाठी राज्यशासनाकडून भरघोस निधी आणला असून या ठिकाणी सुसज्ज अद्यावत, अशी इमारत उभी केली जाणारा आहे. शासनाकडून या स्थानकासाठी तब्बल १६ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे आता अहिल्यानगरच्या वैभवात भर पडणार असून प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे, अशी माहिती आमदार संग्राम जगताप यांनी दिली.**

जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील सर्वात जुने बसस्थानक म्हणून माळीवाडा बसस्थानकाची ओळख आहे. मात्र, आता हे बसस्थानक कात टाकणारा असून तेथे नवीन सुसज्ज अशी भव्य इमारत उभी राहणारा आहे. त्यासाठी राज्य शासनाकडून तब्बल १६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. लवकरचनगरकरांच्या सेवेत ही इमारत उभी राहणार आहे, अशी माहिती आमदार जगताप यांनी दिली.

# मंत्रिपद न मिळाल्याने नाराज नाही – वळसे पाटील

## पक्षाने घेतलेला निर्णय मान्य । भुजबळांबाबत केले मोठे भाष्य

**मुंबई : प्रतिनिधी**

**देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात काही जुन्या तर अनेक नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली. नवीन चेहऱ्यांना संधी दिल्यामुळे ज्येष्ठ नेत्यांना डच्चू मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील आणि छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. त्यामुळे भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. भुजबळ यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. मात्र, दिलीप वळसे पाटील यांनी आपण नाराज नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.**



मंत्रिमंडळात मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे आपण नाराज आहात का? असा प्रश्न दिलीप वळसे पाटील यांना विचारला असता, पक्षावर माझी काहीही नाराजी नसल्याचे त्यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. तसेच पक्षाने जो निर्णय घेतला आहे तो मला मान्य आहे, असेही ते म्हणाले. छगन भुजबळ यांच्या नाराजीबाबत विचारले असता, छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत. ते नाराज होऊ शकतात. तसेच अनेक जण नाराज देखील असतील. मात्र मी नाराज नाही, असे ते म्हणाले.

**छगन भुजबळ बंडाच्या तयारीत?**

मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे जाहीर केली. तसेच जहाँ नहीं चैना, वहाँ नहीं रहना, असे सूचक विधानही त्यांनी केले. सोबतच आपण कार्यकर्त्यांशी बोलून पुढची भूमिका जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे छगन भुजबळ आता बंड पुकारण्याच्या तयारीत तर नाहीत ना? अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहेत.

**नाराजी दूर केली जाईत**

छगन भुजबळ यांची नाराजी दूर केली जाईल, असे राष्ट्रवादी काँग्रेस तसेच महायुतीच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे. छगन भुजबळ यांना भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती चांगले स्थान देईल, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

**भुजबळांना डावलल्यानंतर विरोधकांकडून महायुतीवर टीका**

छगन भुजबळ ओबीसी समाजाचे नेतृत्व करतात. मात्र विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांचा वापर करण्यात आला आणि नंतर मात्र त्यांना बाजूला करण्यात आले, असल्याची टीका काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. छगन भुजबळ हे ओबीसी आक्रमक चेहरा आहेत. त्यामुळे ते मंत्रिमंडळात हवे होते, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

# शहरात भाजप सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

**नगर : प्रतिनिधी**

**भाजप प्रदेश कार्यालयाच्या सूचनेनुसार शहरात पक्षाच्या सदस्यता नोंदणी अभियान सुरवात झाली आहे. नगर शहरात जास्तीत जस्त सदस्य नोंदणी होण्यासाठी बूथ व प्रभागनिहाय नियोजन करण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक प्रभागात प्रभारी नेमण्यात आले असून शहरातील २९७ बुथवर पक्षाचे पदाधिकारी सदस्य नोंदणी करण्यात येत आहे. अगामी काळात होणाऱ्या महापालिका निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर हे सदस्य नोंदणी अभियान सुरु असून जास्तीत जास्त सदस्यांनी नोदंणी करून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन शहरजिल्हा सरचिटणीस प्रशांत मुथा यांनी केले आहे.**



भाजपच्या वतीने भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथी निमित्त सदस्यता नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरचिटणीस सचिन पारखी, महिला अध्यक्षा प्रिया जानवे, महेश नामदे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेलांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे मनोगते पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करून त्यांना आदरांजली वाहिली.


# मला राज्यसभा हवी होती, तेव्हा सुनेत्राताईंना पाठवलं, मग काय बोलणार?

## छगन भुजबळांची खदखद । म्हणतात लहान खेळणं आहे का मी?

**नाशिक :प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीला ऐनवेळी माझं नाव पुढे केल्यामुळे मी माघार घेतली, नंतर राज्यसभेची संधी आल्यावर मी इच्छा व्यक्त केली, तर सुनेत्रा ताईचं नाव आलं, त्यामुळे काही बोलताच आलं नाही, अशा शब्दात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. मी काय लहान खेळणं आहे का? असा सवाल विचारत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मला मंत्रिमंडळात घेण्याची इच्छा होती, मात्र तसं झालं नाही, असं म्हणताना छगन भुजबळांनी अप्रत्यक्षपणे अजित पवार यांच्याकडे बोट दाखवलं आहे. येवल्यात समता परिषदेच्या कार्यकर्त्यांसोबत बैठक झाल्यानंतर भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला.**

लोकसभेवर मी जातो म्हणालो, ऐनवेळी तुम्ही कच खालली, नाव जाहीर नाही केलं, राज्यसभेची जागा आली, मी म्हटलं मला जाऊ द्या, त्यांनी सांगितलं सुनेत्रा ताईंना पाठवायचं आहे, मी म्हटलं ठीक आहे, मी आता काही बोलतच नाही, दुसरी



जागा आली, तिथे मकरंद पाटील यांचे बंधू नितीन पाटील यांना संधी दिली. मी म्हटलं, अरे मला जाऊद्या, माझा फायदा पक्षाला होईल, मी ४० वर्ष इथे आहे, तर म्हणाले की मी त्यांना शब्द दिला आहे, तुम्ही महाराष्ट्रात असणं पक्षाची गरज आहे, तुम्ही लढलं पाहिजे, आम्ही लढलो आणि लढल्यावर आता सांगतात, तुम्ही राज्यसभेवर जा, कारण मकरंद पाटलांना त्यांना मंत्री करायचंय, त्यांनी ते केलं, त्यांच्या भावाला सांगणार तू राजीनामा दे आणि खाली ये, मला सांगणार राजीनामा दे आणि वरती जा, अशा शब्दात छगन भुजबळ यांनी संताप व्यक्त केला.

**भुजबळांनी सांगितलेले प्रमुख मुद्दे**

- राष्ट्रवादीचे सर्व निर्णय अजित पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल घेतात
- देवेंद्र फडणवीस यांनी माझा मंत्रिमंडळात सामावेश करावा असे सांगितले, पण अजित दादांनी शेवटच्या क्षणापर्यंत ऐकले नाही
- फडणवीस माझ्यासाठी आग्रही होते
- प्रश्न मंत्रिपदाचा नाही तर ज्या पद्धतीने अवहेलना करण्यात आली त्याचा आहे.
- लोकसभा निवडणुकीतही असाच खेळ खेळला गेला
- मला राज्यसभा जेव्हा पाहिजे होती, तेव्हा दिली नाही
- मी लहान खेळणं आहे का तुमच्यासाठी
- अजित पवार यांच्याशी माझा संपर्क नाही, पटेल, तटकरे संपर्कात आहेत
- तुम्ही उठ म्हणाले की उठ आणि बस म्हणाले की बस ऐकणारा छगन भुजबळ असा मनुष्य नाही

# एलआयसीच्या वतीने शनैश्वर ग्रामीण रुग्णालयास २७ लाखांची उपकरणे

## सोनोग्राफी मशीन, डोळे तपासणी मशीन व ऑपरेशन मशीनचा समावेश



**नेवासा : प्रतिनिधी**

**कुकाणे भारतीय जीवन विमा निगम पुणे विभाग यांच्याकडून श्रीक्षेत्र शनी शिंगणापूर येथील ग्रामीण रुग्णालयास अत्याधुनिक प्रतीचे १३ लाख रुपये किंमतीचे सोनोग्राफी मशीन व १४ लाख रुपये किंमतीचे डोळे तपासणी व ऑपरेशन मशीन भेट देण्यात आले आहेत. याचा परिसरातील गरजू रुग्णाला फायदा होणार आहे. यामुळे ग्रामीण रुग्णालयात अल्प दरात उपचार होणे शक्य होणार आहे.**

सोनोग्राफी मशिनमुळे परिसरातील विशेष करून गरोदर महिला भगिनींसाठी उपयोग होईल व सोनोग्राफीसाठी शहरात जाण्याची धावपळ होणार नाही. डोळे तपासणी मशिनमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब गरजू रुग्णासाठी अत्याधुनिक सुविधा शनिशिंगणापूर येथे मिळणार आहे. दोन्ही मशिन गुरुवारी १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतीय जीवन विमा निगमचे झोनल मॅनेजर सनोज कुमार, रिजनल मॅनेजर अरुण रझदान, पुणे विभाग प्रबंधक संदीप गोखे, मार्केटिंग मॅनेजर सुयश तेलंग, अहिल्यानगर शाखा चीफ मॅनेजर सुरेश गायकवाड, शेवगाव शाखा वरिष्ठ अधिकारी प्रमोद देव यांच्या हस्ते झाले.

या सोहळ्याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त पोपटराव कुऱ्हाट, छबुराव भुतकर, विठ्ठल आढाव, कार्यकारी अधिकारी गोरख दरंदले, उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे आदी उपस्थित होते. या उपकरणांची भेट मिळवून देण्यासाठी एलआयसीचे तत्कालीन विभागीय प्रबंधक संदीप मोघे, डॉ. रावसाहेब बानकर, विमा प्रतिनिधी बाळासाहेब घावटे, राजेंद्र सानप, अनिल आगळे आदींनी प्रयत्न केले.

**वाचकांच्या लेखणीतून**

# जोशी काकींचे गाणे आणि जाणे

बदलापूरला आमच्या शेजारी जोशी नावाचे कुटुंब रहायचे. सगळे जोशी कुटुंबच स्वभावाने चांगले होते. जोशी काकी तर फारच मनमिळावू आणि बोलक्या स्वभावाच्या होत्या. माझ्या दोन लहान नातींना काकी फार जीव लावीत. हल्ली हे कुटुंब आमच्या समोरच्या कॉम्प्लेक्समध्ये आपल्या मालकीच्या फ्लॅटमध्ये रहायला गेले. तरीही माझ्या नातींना काकी विसरल्या नाहीत. कधी फोनवरून तर कधी स्वतः




आमच्या घरी येऊन आमच्या मुलींची विचारपूस करीत. शाळेला सुट्टी असली म्हणजे कधी कधी मुली शनिवारी काकींकडेच मुक्काम करीत. आंघोळ केल्यावर बदलण्यासाठी माझ्या त्यांचे कपडेही त्या बरोबर घेऊन जात. मुली काकींबरोबर हॉटेलमध्ये खाद्य पदार्थांचा आस्वाद घेत. कधी कधी खेळणी वा खाऊसाठी हट्ट धरीत. काकी तो पुरा करीत. काकींची महागडी कार आहे. तिच्यात बसून मुलींना त्या फिरवून आणीत. लग्न समारंभ आणि वाढदिवसानिमित्त नेत. कधी कधी शाळेत घेऊन जाणारी बस चुकली तर काकी याच कारने मुलींना शाळेतही सोडीत.
काकींना नटण्या मुरडण्याची हौस होती. आपले जीवन आनंदीपणे व्यतीत करण्याची त्यांची ती रीत असे. नवीन साडी किंवा नवीन घडविलेला दागिना लेवून काकी आमच्या घरात येत आणि आमच्या घरच्या महिला वर्गाला विचारीत, कशी वाटली साडी? कसा वाटला गळ्यातला हार? त्यावेळी काकींच्या चेहऱ्यावरील आनंद न्याहाळण्यासारखा असे! त्यावर स्मित हास्याची झळाळी असे.
दोनतीन दिवसांपूर्वी काकी देवाघरी गेल्याचे कळले. पन्नाशीच्या दरम्यान वय असावे. तशा त्या दीर्घ काळ आजारी असल्या तरी उपचार चालू होते. म्हणतात ना आले देवाजीच्या मना...
काकींनी जीवनाचा डाव अर्ध्यावरच सोडला. वाईट वाटले. जाण्यापूर्वी माझ्या नातींना भेटण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. काही कारणामुळे ते जमले नाही. मी गावी असल्याने काकींच्या अंत्यविधीला हजर राहू शकलो नाही. पण माझ्या मुलाने पहिली दुसरीत शिकणाऱ्या दोन्ही मुलींना शाळेतून लवकर आणले आणि काकींचे अंत्यदर्शन घडविले. फार करुण प्रसंग होता तो!
काकींनी माझ्या लहान नातीला एक गाणे शिकविले होते -
एक होती मुंगी
तिचे नाव चिंगी
तिच्या ढुंगीला
चावली मुंगी
एवढेच होते ते गाणे. लयनाद असल्याने नातीचे ते गाणे पाठ तर झालेच; पण ती ते अगदी ठेक्यात म्हणूनही दाखवी. तिच्याच तोंडून ते ऐकण्यातच खरी मजा असे. लहान मुलांना यातल्या तारतम्याशी काही देणेघेणे नसते. तशी अपेक्षाही आपण ठेवू नये.
काकींची भेट नाही पुन्हा
गाऊ त्यांच्या गुणा गुणा
एवढेच आता उरले म्हणायचे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

भेट घेतल्याचे सांगितले जाते. या भेटीनंतर त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीही भेट घेतली.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांची भेट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बातचीत करताना या भेटीबद्दल भाष्य केले. ते म्हणाले, ''महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेतले जाती, अशी या सरकारकडून अपेक्षा आहे. या व्यतिरिक्त ही निवडणूक कशी जिंकली वैगरे हे प्रश्न आहेतच. त्याबाबत जनतेत जाऊन आवाज उचलत राहू.''

### मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा हत्यार उगारले

मराठ्याने घरी थांबायच नाही, सर्वांनी इथे यायचं. अंतरवली-सराटीत तुफान ताकदीने मराठ्यांनी एकत्र यायचं. जगात मराठ्यांच्या एकजुटीला तोड नव्हती.२५ जानेवारी २०२५ पासून ते अंतरवली सराटीत आमरण उपोषणाला बसणार आहेत. हे सामूहिक आमरण उपोषण असेल असं त्यांनी सांगितलं. म्हणजे ज्यांना स्वेच्छेने उपोषणाला बसायच आहे, ते बसू शकतात. पण कोणावरही जबरदस्ती नसेल. रकारला वाईट वाटेल, पश्चाताप होईल, इतकं भयंकर आंदोलन होईल. मराठा समाजाच्या एकजुटीने सरकारचे डोळे विस्फारतील'', असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

# वर्षाअगोदरच बाबुर्डी रस्त्याला पडले खड्डे!




सुपा : प्रतिनिधी

**सुपा-पारनेर नविन औद्योगिक वसाहतीतील मिंडा कंपनी ते बाबुर्डी या रस्त्याची वर्ष पुर्ण होण्यापुर्वीच दुर्दशा झाली असून खडडे पडल्याने वाहन चालकांना मनस्ताप सहन करण्याची वेळ आली आहे. हे काम निकृष्ट झाल्याचा आरोप करून या कामाच्या चौकशीसाठी मनसे नेते रविश रासकर यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.**

यासंदर्भात रासकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, या रस्त्याचे काम ५ जानेवारी २०२४ रोजी सुरू करण्यात आले होते. काम पुर्ण करण्याची मुदत १२ महिन्यांची असून मुदत संपण्याआगोदरच रस्त्याची वाट लागल्याने शासनाने या रस्त्यावर केलेला खर्च वाया गेला आहे.

अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे रूंदीकरण, माती भराव, खडीकरण, मुरूम, बाजू पट्‌टी, कच्चे घटक संकीर्ण बाबींनुसार मजबुतीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे होते. मात्र बाबुर्डीपर्यंतच्या रस्त्याचे काम होउन काही अवधी लोटला नाही तोच ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडून रस्ता उखडला गेला आहे. अंदाजपत्रकानुसार ठेकेदाराने हे काम पुर्ण केले नाही. रस्त्याच्या साईड पटटयाही भरण्यात आलेल्या नाहीत. पाणी वाहून जाण्यासाठी चरही काढण्यात आलेला नाही.

निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून त्याला कायमस्वरूपी काळया यादीत टाकावे. तसेच ५ जानेवारीपर्यंत अंदाजपत्रकानुसार काम झाले नाही तर बाबुर्डी-म्हसणे फाटा फेज २ एमआयडीसी चौक येथे दि.१३ जानेवारी पासून उपोषणास बसणार असल्याचे मनसेचे तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी सांगितले.

### दोन रस्त्यांची तुलना !

**सुपा-पारनेर एमआयडीसी फेज २ मध्ये काही वर्षांपूर्वी अंतर्गत रस्ते तयार करण्यात आले असून याच रस्त्यावरून पुढे बाबुर्डी रस्ता जातो. एमआयडीसी मार्फत एमआयडीसीच्या हद्दीमध्ये तयार करण्यात आलेला रस्ता आजही सुस्थितीत आहे. दुसरीकडे याच रस्त्याला पुढे बाबुडला जोडणाऱ्या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आले असून वर्ष होण्यापूर्वीच त्याची वाट लागल्याने प्रवासी या दोन रस्त्यांची तुलना करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्ट कारभारावर ताशेरे ओढत आहेत.**

# राज्य सरकारचा अल्पसंख्याक समाजावर अन्याय

## ...तर आगामी निवडणुकीत परिणाम दिसतील समता परिषदेचे खंडूजी भुकन यांचा इशारा



निघोज : प्रतिनिधी

**ज्येष्ठ माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिपद न दिल्याने तो अल्पसंख्याक समाजावर महायुती सरकारनेही अन्याय केला असून याचा आगामी निवडणुकीत मोठा परिणाम दिसून येईल असा इशारा समता परिषदेचे जिल्हा मुख्य पदाधिकारी खंडूजी भुकन यांनी दिला आहे.**

ओबीसी समाज बांधवांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यासमोर महायुती सरकारचा निषेध केला यावेळी समता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष सुभाष लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, ओबीसी नेते अनिल निकम, नगरसेवक दत्ता जाधव समता परिषदेचे जिल्हा मुख्य पदाधिकारी खंडूजी भुकन यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भुकन यावेळी म्हणाले ओबीसी समाजासाठी भुजबळ यांचे मोठे योगदान आहे. महायुती सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची जबाबदारी ओबीसी समाजाने घेतली होती व यामुळे हे सरकार मोठ्या संख्येने निवडून आले आहे याचा विसर या सरकारला पडला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिपद देण्याची आज खऱ्या अर्थाने गरज असून हे मंत्रीपद न दिल्यास याचा परिणाम आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका या निवडणुकीत प्रामुख्याने दिसून येईल याचा सर्वाधिक फटका अजित पवार यांच्या पक्षाला मोठ्या प्रमाणात बसणार असून याचा विचार अजित पवार यांनी केला पाहिजे अन्यथा त्यांचा पक्ष संपेल असा इशारा भुकन यांनी दिला आहे.

यावेळी महायुती सरकारचा जोरदार निषेध करीत भुजबळ साहेब आगे बढो तसेच भुजबळ यांच्या विजयाच्या घोषणा देत महायुती सरकारच्या निषेधाच्या घोषणा दिल्या असल्याची माहिती भुकन यांनी दिली आहे.

# उपसरपंच क्रिकेट स्पर्धेत दादा फायटर संघ प्रथम

## शिवबा फायटर द्वितीय तर सरपंच इलेव्हन तृतीय

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील उपसरपंच क्रिकेट स्पर्धेत दादा फायटर संघाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक शिवबा फायटर संघाला तसेच तृतीय पारितोषिक सरपंच ईलेव्हन अळकुटी संघाला मिळाले.**



उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धेत संघ मालक मंगेशशेठ लाळगे यांच्या दादा फायटर या संघाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

गेली तीन दिवस सुरू असलेल्या या स्पर्धला क्रिकेट शौकिनांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. गेली पाच वर्षांपासून निघोज गावचे कार्यसम्राट उपसरपंच माऊली उर्फ ज्ञानेश्वर वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

मंगेशशेठ लाळगे, भास्करराव उचाळे, खंडू घुले, शैलेश ढवळे, रोहन वरखडे यांच्या मालकीचे हे तीनही संघ आहेत. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मधुकर उचाळे, पंकज कारखिले, राहुल सुकाळे, नृत्य सम्राज्ञी सायली पाटील, सुनिल पवार, भास्करराव वराळ , दिलीप ढवण, दत्ताजी उनवणे, भास्करराव कवाद, शिवा पवार, अरूण चौधरी आप्पासाहेब वराळ , सुभाष वराळ या मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.
या स्पर्धेचे आयोजन अर्जुन लामखडे, गंगादादा वरखडे, निवृत्ती वरखडे, अक्षय वरखडे, सुशांत वरखडे, संकेत वरखडे, ओम पानमंद, रवी लामखडे, वैभव वरखडे, शुभम लामखडे, किशोर वरखडे आदींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

या स्पर्धेच्या बक्षीस समारंभात बोलताना सुजित झावरे पाटील यांनी सांगितले की गेली पाच वर्षे नियमितपणे आयोजन करून माऊली वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी निघोज परिसरातील क्रिकेट शौकीनांना एक उत्कृष्ट खेळाची मेजवानी दिली आहे. माऊली वरखडे, निवृत्ती वरखडे या बंधूंनी सामाजिक, धार्मिक , सांस्कृतिक, क्रिडा व मनोरंजन क्षेत्रात काम करताना मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे.निघोज व परिसरातील विकासासाठी वरखडे यांचे योगदान सर्वाधिक असून येत्या पंचवार्षिक मध्ये त्यांना मोठे उज्वल भवितव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुप्याच्या आंबेडकर स्मारकाची दुरूस्ती करा

## मनसे नेते अविनाश पवार यांची मागणी



सुपा : प्रतिनिधी

**नगर-पुणे महामार्गावरील सुपे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची दुरावस्था झाली असून आंबेडकरी जनतेच्या भावनांचा विचार करून स्मारकाची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी मनसे नेते अविनाश पवार यांनी केली आहे.**

पवार यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकाच्या दुरावस्थेकडे स्थानिक ग्रामपंचायतीसह सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. या दुरावस्थेकडे मनसेच्या वतीने ग्रामपंचायतीस निवेदन देण्यात येऊन लक्ष वेधण्यात आले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या छताला गळती लागली आहे. स्मारकास जाळया नसल्याने धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. प्रवेशद्वार खराब झाल्याने स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. गेल्या आठवड्यात परभणीमध्ये समाजकंटकांनी ज्या पध्दतीने गैरकृत्य करण्यात आले तसेच गैरकृत्य इथे घडले तर याला जबाबदार कोण ?

३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजी दरवर्षी असंख्य आंबेडकरी बांधव मोठ्या संख्येने भिमा कोरेगाव येथे विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी जातात. नगर-पुणे महामार्गावरून भिमा कोरेगांवकडे जाणारे अनेक समाज बांधव सुप्यातील स्मारकामध्ये रात्रीच्या प्रवासादरम्यान विसाव्यासाठी थांबतात. त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून या स्मारकाची दुरूस्ती करून तिथे सोई सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पवार यांनी केली आहे. आंबेडकरी बांधवांच्या भावनांचा आदर ठेवला गेला नाही तर रोषाला सामोरे जावे लागेल असा निर्वाणीचा इशाराही पवार यांनी दिला आहे. सुपा ग्रामपंचायत प्रशासनास निवेदन सादर करताना जानकू सुर्यवंशी, तुषार बोरगे, सागर गायकवाड, शेखर जाधव, सचिन उमाप, सागर सुर्यवंशी, नितीन जाधव, दिपक सुर्यवंशी, अतिश सुर्यवंशी, विशाल जाधव, बबन औचिते, भैयया जाधव, सागर शिंदे आदी उपस्थित होते.

# ४८ वर्षांनंतर पासष्ठीतील विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा!

## जवळयाच्या धर्मनाथ विद्यालयात रमले माजी विद्यार्थी

जवळे : प्रतिनिधी

**इंटरनेट, सोशल मीडियाच्या माध्यमातून अवघे जग एका क्लिकच्या अंतरावर आले असून त्याच माध्यमातून ४८ वर्षांपूर्वी एका वर्गात शिकलेले विद्याथ वयाच्या पासष्ठाव्या वर्ष एकत्र आले आणि त्यांनी स्नेहमेळावा मोठया उत्साहात पार पाडला. मोठया कालखंडानंतर शाळेत पोहचलेल्या या पासष्ठीतील विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला.**




माजी विद्यार्थी अविनाश नारायण जाधव यांच्या समन्वयातून या स्नेह मेळाव्याचा योग जुळून आला. या मेळाव्यासाठी निवृत्त झालेले शिक्षक उत्तम लंके, निवृत्ती खोसे, बी.जी.झावरे, शिक्षिक मुळे यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रीत करण्यात आले होते. सेवा निवृत्त होऊन जवळे येथे वास्तव्यास असलेल्या शिक्षिका आढाव, बापू लोंढे, तुकाराम सालके, भागाजी आढाव, विठ्ठल सुताजी, ज्येष्ठ नागरीक सोन्याबापू जाधव, लक्ष्मीबाई जाधव, संभाजी सालके, गणपत सालके, अजित सोमवंशी, पोपट जाधव, भगवान खुपटे हे देखील पासष्ठीतील विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यास उपस्थित होते.

अध्यक्षस्थान भुषविले. मा. सरपंच किसनराव सालके, सुभाष आढाव, मुख्याध्यापक दादाभाऊ पठारे यांनीही या मेळाव्यास भेट देत शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अनेक वर्षानंतर एकत्र जमलेल्या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत आठवणींना उजाळा दिला. स्नेहभोजनाने मेळाव्याची संगता झाली.

### पासष्ठीतील विद्यार्थी

**अविनाश जाधव, रामदास घावटे, अशोक सालके, संपत देशमुख, मधुकर पठारे, नानाभाऊ जाधव, शहाजी कारखिले, तात्याभाऊ बेंडाळे, राजाभाऊ पठारे, विठ्ठल सालके, ज्ञानदेव सालके, ज्ञानदेव वेताळ, अलीखा सय्यद, अशोक शेलार, तिलोत्तमा पठारे.**

### दोन्ही शाळांना भेट

**धर्मनाथ विद्यालयासाठी सायकल स्टॅण्ड तर प्राथमिक शाळेस डायस भेट देत या माजी विद्यार्थ्यांनी शाळेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखीत केली. उपस्थित मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांच्या या योगदानाचे कौतुक केले.**

# अध्यात्म हाच जीवनाचा अविष्कार!

## स्वामी शिवानंद महाराजांचा संदेश

पळवे खुर्द : सुदाम दरेकर

**जीवनात सुखाबरोबरच भगवंताची प्राप्ती करायची असेल तर स्वतःमधील षडविकरांना दुर करावे लागेल. अध्यात्म हाच जीवनाचा अविष्कार असून ज्ञान भक्तिच्या जोरावर आत्मकल्याण करून भगवंताची प्राप्ती करता येते. असा संदेश ओम दादाजी दरबाराचे प्रमुख स्वामी शिवानंद महाराज यांनी केले.**



पिंपळनेर, जिल्हा धुळे येथील धुनीवाले महाराज दरबारात स्वामी धुनीवाले दादाजी महाराज खंडवा यांच्या बाशनिमित्त आयोजित अध्यात्मिक प्रवचनात शिवानंद महाराजांनी मार्गदर्शन केले.
स्वार्थाशिवाय जीवन जगणारा मनुष्यच मानवता व आनंद प्रस्थापित करू शक

तो असे सांगत शिवानंद महाराज यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले, शरीर हे आपले साधन असून आद्यपरमात्म्याची प्राप्ती हे आत्म्याचे ध्येय आहे. सदगुरू जर हे तपोबलाने युक्त असतील तर आपण याच देहाच्या सहाययाने भगवंत स्वरूप बनू शकतो. आद्य दादाजी हेच आपले आराध्य दैवत आहेत. आणि साधनेने त्यांच्यापर्यंत आपण पोहचू शकतो, हे अटल सत्य असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री महान १००८ धनंजय सरकार, शिवाजी लोंढे, प्रमोद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्वात्मक ओम शिवानंद दादाजी परिवार प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष गोरख तांबे, सचिव जालिंदर दांडगे, खजिनदार बाळासाहेब भंडारी, कृष्णांत शिंदे, बबनराव खेडकर, पिंपळनेर दरबाराचे अध्यक्ष अनिल सोनवणे, कैलास राजपुत, मदनशेठ पाटील, अशोक कोठावदे, नानाजी पगारे, दयाराम कर्हेकर, भटटू सोनवणे, सतीश करपे, अंबादास चव्हाण, भुषण कोठावदे, शिवाजी लोंढे, शिवप्रसाद दिवटे, डॉ. सतीश पगारे, अमोल नलगे, रावसाहेब नागरे, सुभाष विधाते, अनंत लंगडे यांनी परिश्रम घेतले. चहा-पान, प्रसाद, आलेल्या भाविकांची राहण्याची तसेच वाहनांच्या पाकगची चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. प्रमोद शिंदे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

# जि.प.शाळांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल

## सरपंच पंकज कारखिले यांचे प्रतिपादन



राळेगण थेरपाळ : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळालेली शैक्षणिक संजीवनी असून या शाळांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल झाले असल्याचे प्रतिपादन राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले यांनी व्यक्त केले आहे.**

जिल्हा प. प्रा. शाळा, राळेगण थेरपाळ येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी देवराम पिंपरकर यांचे हस्ते व केंद्रप्रमुख श्री नारायन बाचकर, सरपंच पंकजदादा कारखिले, शिक्षक बँकेचे संचालक कारभारी बाबर सर, उपसरपंच निलेश शितोळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत कार्ले उपाध्यक्षा प्रियंका गाडीलकर दत्तात्रय कारखिले, नरेश सोनवने शशिकांत कारखीले, पत्रकार जयदिप कारखिले, संदीप डोमे, गणेश गाडीलकर, गणेश लामखडे, राजेंद्र शितोळे, गोकुळ कळमकर आदिंसह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच कारखिले यावेळी म्हणाले जिल्हा परिषद शाळा आहेत म्हणून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येते हे सगळ्यांनाच मान्य करावे लागेल मात्र शैक्षणिक संस्कृतीत महत्वपूर्ण बदल या शाळांच्या माध्यमातून झाला आहे.अतिशय गुणवंत शाळा म्हणून जिल्हा परिषद शाळांचा नावलौकिक असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी श्री देवराम पिंपरकर यांनी शाळेत होत असलेले उपक्रमाविषयी आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांसाठी, व्यक्तीमत्व विकासासाठी असे कार्यक्रम प्रत्येक शाळेत होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करत शाळेला ग्रामस्थांचे असलेल्या सहकार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सामाजिक, धार्मिक, देशभक्तीपर गीत, लोकगीत भक्तीगीत उत्साहात सादर केले. ग्रामस्थांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक शिक्षकही आवर्जून उपस्थित होते.

यावेळी शाळेची प्रगती आणि गरज पाहून जि.शिक्षक बँकेकडून इंटरऍक्टीव बोर्ड दिला असल्याचे प्रतिपादन शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्या. फापाळे मॅडम ,सर्व शिक्षक, शाळा व्यस्थापन समिती यानी परिश्रम घेतले निवेदन सुप्रसिद्ध निवेदक राजेंद्र पोटे यांनी केले.

# किसान संकुलात शनिवारपासून क्रीडा महोत्सव

## शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही भरारी

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील सीबीएसई अभ्याक्रम असलेल्या किसान इंटरनॅशनल स्कुल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, आर्टस, कामर्स, लॉ कॉलेजमध्ये येत्या शनिवारपासून क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शैक्षणिक गुणवत्तेचे संवर्धन करतानाच किसान संकुल आता क्रीडा क्षेत्रातही भरारी घेत आहे.**



किसान शैक्षणिक संकुलाच्या वतीने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच कला, क्रीडा व सांस्कृतीक क्षेत्रातील गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी सांगितले.

शनिवार दि.२१ रोजी तिन दिवसीय क्रीडा महोत्सवास प्रारंभ होणार असून तिसऱ्या दिवशी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या आयोजनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. या महोत्सवात आंतर शालेय विविध स्पर्धा पार पडणार असून त्यात सर्व विद्यार्थी सहभागी होतात. शनिवारी सकाळी किसान संकुलाचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या हस्ते स्पोर्टस मशाल पेटवून क्रीडा स्पर्धेस प्रारंभ होणार असून विद्यार्थ्यांबरोबरच त्यांचे पालकही या सोहळयास उपस्थित राहणार आहे.

### विविध स्पर्धांचे आयोजन

**या महोत्सवात प्रामुख्याने खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, रनिंग, हाईल्स, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, भाला फेक, थाळी फेक तसेच इतर खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार असून क्रीडा महोत्सवाच्या घोषणेनंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहावयास मिळत आहे.**

### गुणवंत खेळाडू पुढे येतील

**या शैक्षणिक वर्षात तालुका, जिल्हा व विभाग स्तरीय स्पर्धेत किसानच्या खेळाडूंनी यश संपादन करून किसान संकुलाचा नावलौकिक वाढविला आहे. क्रीडा महोत्सवाचे आयोजन करून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न असून त्यातून निश्चित गुणवंत खेळाडू पुढे येतील.**

**चंद्रकांत चेडे**
अध्यक्ष, किसान शैक्षणिक संकुल

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com